# University of Mumbai

पुर्नमुल्यांकन व छायांकित प्रत कक्ष,
परीक्षा विभाग/निकाल कक्ष
महात्मा फुले भवन,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व),
मुंबई – ४०० ०९८.

क्र.परीक्षा/पुर्नमुल्यांकन व छायांकित प्रत कक्ष/३८८८/२०१७

परिपत्रक :–

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक/प्रमुख, विद्यापीठाशी संलग्नित/संचालित महाविद्यालयांचे प्राचार्य, मान्यताप्राप्त संस्थाचे संचालक/प्रमुख, दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक नि संचालक, विद्यापीठाच्या रत्नागिरी व ठाणे उपकेद्रांचे समन्वयक/संचालक, यांना कळविण्यात येते की, द्वितीय सत्र–२०१७ मध्ये घेण्यात येत असलेल्या परीक्षांसाठीचे **पुर्नमुल्यांकन व छायांकित प्रतींसाठीचे अर्ज संबंधित परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यापासुन २० दिवसाच्या आत सॉफ्ट कॉपी(सी.डी) व हार्ड कॉपी(पारंपरिक अर्ज) स्वरूपात परिपूर्णरित्या भरून संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांच्या सहीशिक्क्यानिशी विहित शुल्कासह परीक्षा विभागातील पुर्नमुल्यांकन व छायांकित प्रत कक्ष, रूम नं. ४७, दुसरा मजला, येथे स. ११.०० ते दु. २.३० या कालावधीत हस्तेपोच सादर करावेत ही विनंती.**

अर्ज सादर करण्यासाठीच्या विशेष महत्वाच्या सुचनाः–

१) पुर्नमुल्याकंनाच्या अर्जासाठी स्वतंत्र सी.डी व पत्र तसेच छायांकित प्रतीच्या अर्जासाठी स्वतंत्र सी. डी व पत्र सादर करावीत.

२) सदर दोन्ही बाबी एकाच सी.डी. व त्यासाठी एकच पत्र असल्यास अर्ज स्विकारले जाणार नाही.

३) अर्ज परिपूर्णरित्या व अचूक भरलेले आहे याची खात्री करून घ्यावी. अर्ज अपूर्ण भरलेला व अर्जात चूकीची माहिती असल्यास व यामुळे भविष्यात काही बाबी उद्‌भवल्यास त्यास संबंधित महाविद्यालय जबाबदार राहील.

४) अर्ज स्विकारण्याची मुदत संपल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

५) शुल्काचा तपशीलः–

| | खुल्या प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी | राखीव प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी (Those who gets concession is tutuion fees and other fees) |
|---|---|---|
| पुर्नमुल्यांकनः– | रू. २५०/– | रू. १२५/– |
| छायांकित प्रतः– | रू. ५०/– | रू. २५/– |

उपरोक्त बाबीची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी ही विंनती

23/11/17

मुंबई – ४०००९८
दि. २३ नोव्हेंबर, २०१७.

प्रा. (डॉ.) अर्जुन घाटुळे
प्र. संचालक,
परीक्षा व मुल्यमापन मंडळ

अ. प्रतः–

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक/प्रमुख, विद्यापीठाशी संलग्नित/संचालित महाविद्यालयांचे प्राचार्य, मान्यताप्राप्त संस्थाचे संचालक/प्रमुख, दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक नि संचालक, विद्यापीठाच्या रत्नागिरी व ठाणे उपकेद्रांचे समन्वयक/संचालक.

ब. प्रत माहितीस्तव व योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषितः–

१. संचालक, केंद्रीय संगणक सुविधा विभाग
२. सर्व उपकुलसचिव, मुख्य लेखापाल वित्त व लेखा विभाग, परीक्षा विभाग
३. सर्व सहायक कुलसचिव, परीक्षा विभाग

क. प्रत माहितीसाठी अग्रेषितः–

१. मा. संचालक विद्यार्थी कल्याण विभाग
२. मा. कुलगुरू यांचे कार्यकारी सचिव
३. मा. प्र. कुलगुरू यांचे स्विय सहायक
४. मा. कुलसचिव व संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ यांचे स्विय सहायक